# पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण

पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक:- १५/०८/२०१८

**ग्रामीण पोलीस दलातील आय.एस.ओ. मानांकित पोलीस ठाण्यांना पालकमंत्री यांचे हस्ते प्रमाणपत्र वितरण, ग्रामीण पोलीस दलाचे संकेतस्थळाचे लोकार्पण**

---

दिनांक १५ ऑगस्ट २०१८ रोजी स्वंतत्र दिनाचे औचित्य साधुन नाशिक जिल्हयाचे पालकमंत्री तथा जलसंपदा मंत्री महाराष्ट्र राज्य **मा.ना.श्री. गिरीषजी महाजन सो.**यांचे शुभहस्ते ग्रामीण पोलीस दलातील आय.एस.ओ.मानांकन प्राप्त पोलीस ठाण्यांना प्रमाणपत्र वितरण तसेच ग्रामीण पोलीस दलाचे संकेतस्थळाचे लोकार्पण सोहळयाचा कार्यक्रम नाशिक विभागीय आयुक्त कार्यालयात पार पडला. कार्यक्रम प्रसंगी **मा.विभागीय आयुक्त श्री. राजाराम माने सो., नाशिक शहर पोलीस आयुक्त डॉ.श्री.रविंद्रकुमार सिंगल सो, नाशिक परिक्षेत्राचे विशेष पोलीस महानिरीक्षक डॉ.श्री.छेरिंग दोरजे सो, महाराष्ट्र पोलीस अकादमीच्या संचालक श्रीमती अश्वती दोरजे मॅडम, मा. जिल्हाधिकारी श्री. बी. राधाकृष्णन सो** यांचेसह प्रशासन व पोलीस दलातील इतर अधिकारीही उपस्थित होते. तसेच सदर कार्यक्रमास विद्यमान आमदार श्री.बाळासाहेब सानप, आमदार श्रीमती सिमा हिरे, आमदार श्री. योगेश घोलप, जिल्हा परिषद अध्यक्ष श्रीमती शितल सांगळे तसेच इतर राजकीय पदाधिकारी उपस्थित होते. सर्व मंत्री महोदय व प्रमुख पाहुण्यांचे नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** यांनी स्वागत केले.

विविध देशांमध्ये जनसामान्यांशी निगडीत सरकारी, खाजगी संस्था कार्यालये, उद्योगांना उत्कृष्ट व तत्पर सेवेसाठी आय.एस.ओ. मानांकन दिले जाते. या मानांकनासाठी नाशिक ग्रामीण जिल्हयातील पोलीस ठाण्यांनी अपेक्षित तयारी केली होती. गुन्हेगारीची आकडेवारी, गुन्हयांची उकल, प्रलंबित प्रकरणे, कर्मचारी निवास, विश्राम सुविधा, पिण्याचे पाण्याची व्यवस्था, विभागनिहाय दस्तऐवजांसाठी स्वतंत्र रुम, तक्रारदारांना मिळणारी समाधानकारक वागणुक तसेच कामकाजातील शिस्त आणि व्यवहार या बाबींवर विशेष लक्ष देत जिल्हयातील उपविभागीय पोलीस कार्यालये व पोलीस ठाण्यांनी कामात तत्परता दाखवुन मानांकनावर दावा केला होता. आय.एस.ओ. मानांकन समितीने पोलीस ठाणे व कार्यालयांची प्रत्यक्ष पाहणी करून नाशिक ग्रामीण पोलीस दलातील अपर पोलीस अधीक्षक कार्यालय मालेगाव, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय मालेगाव शहर उपविभाग, कळवण उपविभाग, पेठ उपविभाग असे ०४ कार्यालये, तसेच मालेगाव तालुका, मालेगाव शहर, येवला शहर, सिन्नर, देवळा व पेठ पोलीस ठाणे असे ०६ पोलीस ठाण्यांना आय.एस.ओ.मानांकन मिळाले आहे. दिनांक १५ ऑगस्ट २०१८ रोजी मा.ना.श्री. गिरीषजी महाजन सो. पालकमंत्री नाशिक जिल्हा, यांचे हस्ते उपविभागीय पोलीस अधिकारी व पोलीस ठाण्यांचे प्रभारी अधिकारी यांना आय.एस.ओ. मानांकन प्रमाणपत्र देवुन गौरविण्यात आले. यावेळी मा.पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो. यांनी सर्व पोलीस अधिकारी व कर्मचा-यांच्या सहकार्यामुळे स्मार्ट पोलीस ठाणे करण्यात यश आले असल्याचे प्रतिपादन केले.

तसेच राज्यभरातील पोलीस खात्याचा कारभार लोकाभिमुख व्हावा या उद्देशाने राज्याचे पोलीस महासंचालक सो यांनी राज्यातील सर्व पोलीस घटकांना स्वत:चे संकेतस्थळ बनवण्याच्या सुचना दिल्या आहेत. त्याअनुषंगाने नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे www.nashikruralpolice.gov.in असे नवीन संकेतस्थळ तयार करण्यात आले आहे. स्वतंत्र दिनाचे औचित्य साधुन मा.पालकमंत्री श्री. गिरीषजी महाजन सो यांचे हस्ते नाशिक ग्रामीण पोलीस दलाचे नवीन संकेतस्थळाचे अनावरण करण्यात आले. या संकेतस्थळावर ग्रामीण पोलीस दलाची इत्यंभुत माहिती, तसेच कायदेशीर बाबी, सुरक्षाविषयक माहिती, जिल्हा पोलीस दलाची संरचना, पोलीस मित्र, महिला सुरक्षा कवच योजना व कम्युनिटी पोलीसींग इ. उपक्रमांची अद्ययावत माहिती उपलब्ध करून देण्यात आली आहे.

ग्रामीण पोलीस दलातील वाहतुक शाखा, महिला सुरक्षा विभाग, स्थानिक गुन्हे शाखा या शाखांशी निगडीत माहितीचाही संकेतस्थळावर समावेश करण्यात आला आहे. नुतनीकरण केलेले संकेतस्थळ हे मोबाईल, टॅब, आयपॅड या सारख्या आधुनिक उपकरणांमध्येही सहजपणे ओपन केले जाऊ शकते, नागरीकांना ऑनलाईन तक्रार करण्याची सुविधाही संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहे. तसेच त्यामध्ये सायबर सुरक्षेवर विशेष भर देण्यात आलेला असुन संकेतस्थळ हे नागरीकांना सहज हाताळण्यायोगे लोकाभिमूख बनविण्यात आले आहे. या संकेतस्थळाचा वापर अधिकाधिक नागरीकांनी करावा व काही सुचना अथवा अडचणी असल्यास आपल्या प्रतिक्रिया कळवाव्यात असे आवाहन यावेळी मा.पोलीस अधीक्षक सो यांनी केले आहे.

विभागीय आयुक्त कार्यालय नाशिक येथे पार पडलेल्या सोहळयास नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.**, अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो**. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे, सायबर पोलीस ठाण्याचे सपोनि श्री. तुषार आढावु यांचेसह आय.एस.ओ. मानांकन प्राप्त पोलीस ठाणे व कार्यालयांचे प्रभारी अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.